भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.३२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०५/२०१७

**१) अज्ञात चारचाकी वाहन चालकांच्या हयगयीने चालवुन मोटार सायकल चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंदं . :—**

दिनांक ०३/०५/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील जखमी पोहवा सुभाष अमृत रेहपाडे हा आपले कर्तव्यावर मोटार सायकल क्रमाक एमएच ३६/ यु ०९५५ स्पलेन्डर हाटमार्ट ने पेट्रोलपंप कडुन एनएच ०६ रोडने कवडसी कडे जात असता यातील अज्ञात आरोपी चारचाकी वाहण चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने व भरधाव वेगाने चालवुन जखमीचे मोटार सायकला मागेहुन एनएच ०६ रोड शहापुर ज्ञानेश्वर सभागृहाजवळ येथे धडक दिल्याने जखमीचे डोक्याला उजव्या डोळयाचे वर हाताला, पायाला मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) स्विप्ट डिझायर चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे तीन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०५/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नरेश भास्कर लंजे वय ३० वर्ष, रा. बुधेवाडा जि. गोदिंया याचा साळा शिवदास रामदास कापगते वय ५० वर्ष, व त्याची पत्नी सौ. इंदुताई कापगते वय ४५ वर्ष, व पुतण्या गिरीधर ईश्वर कापगते तिन्ही रा. रेंगेपार असे मिळुन मोटार सायकल क्र. एमएच ३५ एएच ८६५० ने येत असतांनी विरसी फाटया वरुन मोटार सायकल ही विरसी कडे एनएच ६ रोड वरुन वळवितांना साकोली ते देवरी रोडने यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन एकाएकी मोटार सायकला एनएच ६ रोडवर धडक दिल्याने मोटार सायकल चालक व त्याची पत्नी व पुतण्या तिघेही रोडवर मार लागुन हाड फॅक्चर झाले व त्याचे उजवे हाताचे कोणीवर, कपाडावर मार लागले असुन सौ. इंदुबाई हीचे उजवे पायावर मार लागुन जखमी झाली असुन तसेच शिवदास कापगते यांचे उजवे गालावर मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन शासकीय वाहनास धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०५/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी रमेश श्रीराम गोंडाने वय ५७ वर्ष, रा. आंधळगाव यांचे शासकीय वाहन क्र. एमएच ३६/२०१० जिप गाडी ने वरठी वरुन खंडविकास अधिकारी मोरे साहेबा सोबत मोहाडी कडे येत असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन शासकीय वाहनास धडक दिल्याने फिर्यादी सोबतचे मोरे यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. मोहाडी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चांदेवार पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**४) मा. जिल्हाधीकारी साहेब यांचे आदेशाने उल्लघन केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०५/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील दहा ते बारा आरोपीतांनी कोणतीही पुर्व परवानगी न घेता नारे, निर्दशने करुन भाजपा प्रदेश अध्यक्ष रावसाहेब दानवे यांचे पुतळयाचे दहन करुन मा. जिल्हाधीकारी भंडारा यांचे कलम ३७(१)(३) मपोका आदेशाचे उल्लघन केल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गजभिये यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कडपते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**५) शेत शिवारातील बोळीतल्या खांडीत पळुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १२/०५/२०१७ चे १४.०० वा पुर्वी यातील मृतक अंकुश जयदेव भोंडे वय ५० वर्ष, जांभारटोला हा पागल पणाचे भरात घरुन निघुन गेल्याने डोंगरदेव शेत शिवारातील बोळीतल्या खांडीत पळुन मरण पावल्याने फिर्यादी राजकुमार राजाराम बोरकर वय ४५ वर्ष, रा. डोंगरदेव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**६) विषरी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २६/०४/२०१७ चे २०.०० वा दरम्यान यातील मृतक मारोती गोमा निखार वय ६२ वर्ष, रा. वलनी हा दिनांक २६/०४/२०१७ ला दारु पिवुन दारुचे नशेमध्ये विषारी औषध खाल्याने त्यास औषधोपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक २९/०४/२०१७ ला मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाद्वारे पोस्टे पवनी येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मस्के यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १२/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ३० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
पोनी. जिवीशा भंडारा
करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.